महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


## प्रेस नोट

दिनांक :२२/०६/२०२४

## नाशिक ग्रामीण पोलीस भरती - २०२३

---

नाशिक ग्रामीण पोलीस दलाअंतर्गत ३२ पोलीस शिपाई पदांकरीता भरती प्रक्रिया राबविली जात असून त्यासाठी ३२२५ उमेदवारांचे अर्ज आलेले होते. दिनांक १९/०६/२०२४ रोजी पासून पोलीस मुख्यालय मैदान, आडगाव येथे भरती प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली होती. भरती प्रक्रियेदरम्यान दिनांक १९/०६/२०२४ ते २२/०६/२०२४ या कालावधीत उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली.

आज दिनांक २२/०६/२०२४ रोजी हजेरी पटावरील एकुण ५७८ उमेदवारांना भरती प्रक्रियेसाठी बोलविण्यात आलेले होते. त्यापैकी ३३९ उमेदवार उपस्थित राहिले, तर २२८ उमेदवार गैरहजर राहिले. तसेच मागील मैदानी चाचणी बाकी असलेले ०७ उमेदवार असे एकुण ३४६ उमेदवार दि. २२/०६/२०२४ रोजी प्रत्यक्षात हजर होते. उपस्थित उमेदवारांपैकी २८५ उमेदवार मैदाणी चाचणीसाठी पात्र झालेत आणि ६१ उमेदवार उंची/छाती व कागदपत्र पडताळणीत अपात्र झाले. तसेच मागील हजेरी पटावरील मैदानी चाचणी बाकी असलेले ०२ उमेदवारांना देखील मैदानी चाचणीची संधी देण्यात आली.

नाशिक ग्रामीण पोलीस शिपाई पदाकरीता सुरु असलेल्या भरती प्रक्रियेमध्ये दि. १९/०६/२०२४ रोजी पासून ते दि. २२/०६/२०२४ रोजी पावेतो हजेरीपट, कागदपत्र पडताळणी व शारीरिक मोजमापात पात्र ठरलेल्या उमेदवारांची मैदानी चाचणी प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. त्यात प्राप्त हजेरीपटावरील एकुण ३१६० उमेदवारांपैकी १८१८ उमेदवार भरती प्रक्रियेत हजर राहिले, त्यापैकी छाती/उंची व कागदपत्र पडताळणी मध्ये एकुण २५३ उमेदवार अपात्र झाले आहेत. तर, १५६५ उमेदवारांनी मैदानी चाचणी पुर्ण केली आहे.

मैदानी चाचणी पुर्ण केलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांबाबत त्याचवेळी समक्ष सांगण्यात आलेले आहे. भरती प्रक्रियेतील उमेदवारांची मैदानी चाचणी पुर्ण संपलेली असून मैदानी चाचणीमध्ये प्राप्त गुणांबाबतची दैनंदिन यादी नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे वेबसाईट व पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे. मैदानी चाचणीमधून निवड करण्यात येणा-या उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल, त्याबाबत उमेदवारांना कळविण्यात येणार आहे. भरती प्रक्रियेदरम्यान बाहेरील उमेदवारांची राहण्याची व्यवस्था देखील ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आली होती. नाशिक ग्रामीण पोलीस दलातील पोलीस शिपाई पदांकरीता भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व निपक्षपातीपणे सुरु असून कोणीही उमेदवाराने कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये. कोणीही भरती संदर्भात प्रलोभन दाखवत असेल, अशा इसमाविरुध्द कारवाई करण्यात येईल असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.